Wardha Development Report - 2017

# *Towards Village Development*

*Report of*

**Grampanchayat : Bedhona**
**Block : Aarvi**

*Prepared by*

**Collectorate, Wardha**

*In Collaboration with*

**Yashwantrao Chavan Academy of Development Administration**
Rajbhavan Complex, Baner Road, Pune 411 007

## Content


| | |
|---|---|
| Introduction | …4 |
| Methodology | …4 |
| Grampanchayat Profile | …6 |
| Grampanchayat Index | …8 |
| Major Findings | …8 |
| Suggested Interventions | …16 |
| Appendix | …18 |
| Data Tables | …21 |


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | …५ |
| अभ्यास पद्धती | …५ |
| ग्रामपंचायतीविषयक सर्वसाधारण माहिती | …७ |
| ग्रामपंचायती निर्देशांक | …९ |
| प्रमुख निष्कर्ष | …९ |
| शिफारशी | …१७ |

## 1 Introduction

The main objective of the Grampanchayat level report was to identify the households in the villages which require interventions and suggest the interventions. Following parameters were considered for suggesting interventions.

1) Agriculture and irrigation
2) Household infrastructure
3) Mother and child health
4) Education
5) Livelihood and financial inclusion
6) Percolation of Government schemes and use of e-services

The present report provides methodology adopted for the survey of households, the analysis of the data, major findings and interventions for the Grampanchayat of Bedhona in the block of Aarvi.

## 2 Methodology

***Sample size of households***: Bedhona Grampanchayat is a group Grampanchayat with two villages; Bedhona, Ambazari. At the time of survey there were 187 households found. All the 187 households were visited. Out of them 29 households were either closed or refused to give data. As such the data of 158 households was collected. Table 1 provides the data regarding number of households as per Census 2011 of Bedhona, Ambazari, the number of households obtained from Grampanchayat and the number of households from which the data was collected.

**Table 1 Number of Households in Bedhona Grampanchayat**

| SN | Name of village | Number of Households | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | As per Census 2011 | Obtained from Grampanchayat at the time of survey | Found at the time of survey | From which the data was collected |
| 1 | Bedhona | 228 | 248 | 175 | 146 |
| 2 | Ambazari | 15 | | 12 | 12 |
| | **Total** | **243** | | **187** | **158** |

***Tools used for data collection***: Two tools were used for data collection.

i. Schedule for household
ii. Schedule for Grampanchayat

Tools are attached in the main report.

## १. प्रस्तावना

ग्रामपंचायत स्तरावरील अहवाल तयार करण्याचा प्रमुख उद्देश म्हणजे गावातील अशा कुटुंबाचा शोध घेणे, ज्यांना विकास प्रक्रियेत समाविष्ठ करुन घेण्यासाठी काही उपायोजना सुचविण्याची आवश्यकता आहे. प्रामुख्याने या शिफारशी सुचविताना खालील घटक विचारात घेण्यात आले आहेत.

१) कृषी व सिंचन
२) गृहविषयक पायाभूत सुविधा
३) माता व बालकांचे आरोग्य
४) शिक्षण
५) रोजगार व आर्थिक समावेशकता
६) शासकीय योजनांचा लाभ व सुविधांचा उपयोग

सदरचा अहवाल हा बेडोना, ता. आर्वी ग्रामपंचायतीमधील कुटुंबाच्या सर्वेक्षणाची पध्दती, माहितीचे विश्लेषण, प्रमुख निष्कर्ष व शिफारशी इ घटकावर प्रकाश टाकतो.

## २. अभ्यास पध्दती

**कुटुंबाचा नमुना आकार** - बेडोना ग्रामपंचायत ही संयुक्त (गट) ग्रामपंचायत असून यामध्ये बेडोना व अंबाझरी या दोन गावांचा समावेश होतो. प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या वेळी गांवामध्ये १८७ कुटुंबे आढळून आली. या १८७ कुटुंबाकडून माहितीचे संकलन करण्यात आले. त्यामध्ये २९ कुटुंबे सर्वेक्षणाच्या वेळी बंद असल्यामुळे अथवा माहिती पुरविण्यास त्यांनी असमर्थता दर्शविल्यामुळे १५८ कुटुंबाकडून प्रत्यक्ष माहिती प्राप्त झाली. जनगणना २०११ नुसार, बेडोना ग्रामपंचायतीमधील दोन्ही गांवातील कुटुंबाची संख्या, सर्वेक्षणाच्या वेळी ग्रामपंचायत यांच्याकडून प्राप्त कुटुंबसंख्या व प्रत्यक्ष सर्वेक्षण केलेल्या कुटुबांची संख्या खालील तक्ता क्र. ०१ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. ०१. बेडोना ग्रामपंचायतीमधील कुटुंबसंख्या**

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंबसंख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०११ च्या जनगणनेनुसार कुटुंबसंख्या | सर्वेक्षणाच्या वेळी ग्रामपंचायतीकडून प्राप्त कुटुंबसंख्या | प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या वेळी गावात आढळलेली कुटुंबसंख्या | प्रत्यक्ष माहिती संकलन केलेल्या कुटुंबांची संख्या |
| १. | बेडोना | २२८ | २४८ | १७५ | १४६ |
| २. | अंबाझरी | १५ | | १२ | १२ |
| | एकूण | २४३ | २४८ | १८७ | १५८ |

**माहिती संकलनाची साधने** – कुटुंबाकडून माहिती संकलनासाठी खालील साधनांचा उपयोग करण्यात आलेला असून सदरची साधने मुख्य अहवालात जोडलेले आहेत.

- ग्रामपंचायतीसाठी प्रश्नसूची
- कुटुंबासाठी प्रश्नसूची

## 3 Grampanchayat Profile

**Table 2 Grampanchayat Profile at a glance**

| SN | Profile element | Description |
|---|---|---|
| 1. | Type of Grampanchayat | Group Grampanchayat |
| 2. | Number of included villages | 2 |
| 3. | Distance from Taluka Headqaurter | 15 |
| 4. | Population at the time survey | 586 |
| | **Basic services and facilities** | |
| 5. | Mini Aangnwadi | In Village |
| 6. | Aangnwadi | In Village |
| 7. | Primary school | In Village |
| 8. | Upper Primary school | In Village |
| 9. | Secondary school | Within 5 km from Village |
| 10. | Sub-center (health) | In GP |
| 11. | Primary Health Center (PHC) | In GP |
| 12. | Veterinary Hospital | Within 5 km from Village |
| 13. | Kisan Seva Kendra | Within 5 km from Village |
| 14. | Bank | Within 5 km from Village |
| 15. | Credit Society | Within 5 km from Village |
| 16. | Post Office | Within 5 km from Village |
| 17. | Police chauki | More than 5 km from Village |
| 18. | Bus stop | In Village |
| 19. | **Major Crops** | |
| | Cotton, Soya bins, Pulses | |
| | **Implemented schemes** | |
| 20. | Indira/Prdhanmantri/Ramai/Shabri/Adim/Pardhi Awas Yojana | |
| 21. | MGNREGA | |
| 22. | Rastriya Gramin Peyajal Yojana | |
| 23. | Niramal Bharat Abhiyan | |
| 24. | Rajiv Gandhi Panchyat Sakshamikar Yojana | |
| 25. | Paryawarn Santulit Samradhi Gram Vikas Yojana | |
| 26. | Rashtiya Biogas and Fertilizers Managmnet Program | |
| 27. | Jansuvidhe Antergat Vishess Anudan Yojana | |
| 28. | Smart Gram Yojana | |
| 29. | BRGF | |
| 30. | Samudayik Shochyala Yojana | |
| 31. | Grampachyat Bhanvan Construction and Smashan Bhumi Vikas Yojana | |
| 32. | Solar Street Light Yojana | |
| 33. | Pradhanmantri Jandhan Yojana | |
| 34. | Aam Aadmi Vima Yojana | |
| | **Resources around the Grampanchayat** | |
| 35. | Industry (to be checked) | |
| 36. | Highway | |

३. **ग्रामपंचायती विषयक सर्वसाधारण माहिती**

**तक्ता क्र. ०२. दृष्टीक्षेपात ग्रामपंचायत बेडोना**

| अ.क्र. | सर्वसाधारण माहितीचे घटक | तपशिल |
|---|---|---|
| १. | ग्रामपंचायतीचा प्रकार | संयुक्त (गट) |
| २. | समाविष्ट गावांची संख्या | ०२ |
| ३. | तालुका मुख्यालयापासूनचे अंतर | १५ |
| ४. | सर्वेक्षणाच्या वेळीची लोकसंख्या | ५८६ |
| | **पायाभूत सेवा व सुविधा** | |
| ५. | मिनी अंगणवाडी | गावामध्ये उपलब्ध आहे |
| ६. | अंगणवाडी | गावामध्ये उपलब्ध आहे |
| ७. | प्राथमिक शाळा | गावामध्ये उपलब्ध आहे |
| ८. | उच्च प्राथमिक शाळा | गावामध्ये उपलब्ध आहे |
| ९. | माध्यमिक शाळा | गावापासून ५ किमी च्या आत |
| १० | आरोग्य उपकेंद्र | गावामध्ये उपलब्ध आहे |
| ११ | प्राथमिक आरोग्य केंद्र | गावामध्ये उपलब्ध आहे |
| १२ | पशुवैद्यकीय दवाखाना | गावापासून ५ किमी च्या आत |
| १३ | किसान सेवा केंद्र | गावापासून ५ किमी च्या आत |
| १४ | बँक सुविधा | गावापासून ५ किमी च्या आत |
| १५ | पतसंस्था | गावापासून ५ किमी च्या आत |
| १६ | पोष्ट ऑफिस | गावापासून ५ किमी च्या आत |
| १७ | पोलिस चौकी | गावापासून ५ किमी पेक्षा जास्त अंतरावर |
| १८ | बस स्थानक | गावामध्ये उपलब्ध आहे |
| | **प्रमुख पिके** | |
| १९ | कापूस, सोयाबीन, कडधान्य | |
| | **सर्वजनिक लाभाच्या योजना** | |
| २० | इंदिरा/प्रधानमंत्री/रमाई/शबरी/आदिम/पारधी आवास योजना | |
| २१ | महात्मा गांधी रोजगार हमी योजना | |
| २२ | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना | |
| २३ | निर्मल भारत अभियान | |
| २४ | राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान | |
| २५ | पर्यावरण संतुलित समृध्दी ग्राम विकास योजना | |
| २६ | राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम | |
| २७ | जनसुविधे अंतर्गत विशेष अनुदान योजना | |
| २८ | स्मार्ट ग्राम योजना | |
| २९ | मागासक्षेत्र अनुदान निधी योजना | |
| ३० | सामुदायिक शौचालय योजना | |
| ३१ | ग्रामपंचायत भवन बांधकाम व दफनभूमी विकास योजना | |
| ३२ | रस्त्यावर सौरउर्जा पथदिवे उभारणी | |
| ३३ | आम आदमी विमा योजना | |
| | **ग्रामपंचायतीच्या अजूबाजूस असलेली संसाधने** | |
| ३४ | कारखाना | |
| ३५ | महामार्ग (हाय-वे) | |

## 4. Grampanchayat index

Following parameters are considered for Grampanchayat Index (Methodology in the main report):

- Household infrastructure
- Agriculture and irrigation
- Livelihood and financial inclusion
- Education

Awareness of schemes percolation index is also calculated. All the index values are provided in the table below. Indicators used for Index are given in Appendix.

**Table 3 Grampanchayat Index**


| SN | Parameter | Weight | Index value |
|---|---|---|---|
| 1 | Household infrastructure | 10 % | 0.640 |
| 2 | Agriculture and irrigation | 30 % | 0.313 |
| 3 | Livelihood and financial inclusion | 30 % | 0.258 |
| 4 | Education | 30 % | 0.529 |
| 5 | **Composite Index for Grampanchayat** | | **0.394** |
| | Awareness of schemes: percolation index | | 0.114 |

## 5 Major Findings

***Population profile***

1. Out of 586 persons surveyed, males are 305 and females are 281.
2. Majority of the population (59 %) is in the working age. Majority of the population is in the category of Other Backward Class (OBC) followed by Nomadic Tribe (NT) and Scheduled Tribe (ST).
3. 11 households are on encroached area.
4. 67 households are Below Poverty Line (BPL) category.

**Figure 1. Population distribution**




***Household infrastructure***

1. Above 90 % of Households have electricity and have own house.
2. Majority of households (around 59 %) use firewood.
3. Majority of households use hand pump as main source of drinking water. This is followed by tap water.
4. Majority of households (71.5 %) have individual toilets. Almost all the households, barring 4 households use the individual toilet. There are still 42 households going for open defecation.
5. Around half of the households have no facility for waste water outlet. Among them majority are un-aware of Shoshkhadda and its scheme.
6. More than 70 % of the households throw the garbage at open space.

### ३६.ग्रामपंचायत निर्देशांक

ग्रामपंचायतीचा निर्देशांक काढण्यासाठी खालील घटक विचारात घेण्यात आले आहेत (ग्रामपंचायत निर्देशकांची गणना पध्दतीचा उहापोह मुख्य अहवालात केलेला आहे)

१) गृहविषयक पायाभूत सुविधा
२) कृषी व सिंचन
३) रोजगार व आर्थिक समावेशकता
४) शिक्षण

तसेच शासकीय योजनांच्या लाभासंबंधित निर्देशांकाची गणना करण्यात आलेली आहे. सर्व निर्देशांक खालील तक्त्यात देण्यात आले आहेत.

**तक्ता क्र. ०३ ग्रामपंचायत निर्देशांक**

| अ.क्र. | निर्देशक | भारांक | निर्देशांक |
|---|---|---|---|
| १. | गृह व पायाभूत सुविधा | १०% | ०.६४० |
| २. | कृषी व सिंचन | ३०% | ०.३१३ |
| ३. | रोजगार व आर्थिक समावेशकता | ३०% | ०.२५८ |
| ४. | शिक्षण | ३०% | ०.५२९ |
| | ग्रामपंचायतीचा संयुक्त निर्देशांक | | ०.३९४ |
| | शासकीय योजनाच्या लाभाचा निर्देशांक | | ०.११४ |

### ३७.प्रमुख निष्कर्ष –

- **लेकसंख्याविषक**
  १) सर्वेक्षणातील एकूण ५८६ लोकांमध्ये ३०५ पुरुष असून २८१ महिला आहेत.
  २) गावातील बहुतांश लोकसंख्या (५९ टक्के) ही कार्यक्षम वयोगटातील आहे. गावामध्ये इतर मागास प्रवर्गातील कुटुंबसंख्या सर्वाधिक असुन त्याखालोखाल भटक्या जमाती व अनुसुचित जाती या कुटुंबाची संख्या आहे.
  ३) गावातील ११ कुटुंबे ही अतिक्रमण केलेल्या जागेत वास्तव्यास आहेत.
  ४) गावातील ६७ कुटुंबे ही दारिद्र्य रेषेखालील आहेत.

- **गृहविषयक पायाभूत सुविधा**
  १) जवळपास ९० टक्के पेक्षा अधिक कुटुंबाकडे स्वतःचे घर असून विज पुरवठा आहे.
  २) गावातील बहुतांश कुटुंबे (जवळपास ५९ टक्के) इंधनासाठी लाकडाचा वापर करतात.
  ३) गावातील बहुतांश कुटुंबाच्या पिण्याच्या पाण्यासाठीचा मुख्य स्त्रोत हातपंप असून त्याखालोखाल नळाद्वारे होणारा पाणीपुरवठा हा आहे.
  ४) गावातील बहुतांश कुटुंबाकडे (७१.५ टक्के) वैयक्तिक शौचालय असून त्यापैकी ४ कुटुंबे वगळता सर्व कुटुंबे वैयक्तिक शौचालयाचा वापर करतात. अद्याप ४२ कुटुंबे उघड्यावर शौचास जातात.
  ५) जवळपास अर्ध्या कुटुंबाकडे सांडपाण्याची व्यवस्था नसून बहुतांश कुटुंबे ही शोषखड्डा व त्यासंबंधित योजनेबाबत अनभिज्ञ आहेत.
  ६) ७० टक्क्यांपेक्षा अधिक कुटुंबे घनकचरा उघड्यावर टकतात.

***Agriculture***

1. Slightly more than half of the households have own agricultural land.
2. Out of 87 households owning land, 66 are marginal farmers.
3. Majority of them take cash crops such as Soyabeen and cotton.
4. Water is available for 12 months to 10 household out of 89 households. Majority do not have water for 12 months.
5. Various water conservation works is done in the villages. But more than 70 % of the households are not aware of it.
6. None of the farmer is member of the Farmers' Producing Organisation (FPO.)
7. Majority of the farmers do not know about Government schemes related to agriculture.
8. The sources of information about Government schemes related to are other farmers
9. None of the farmers' household prepares compost/wormy compost. The major reasons are reliability on chemical fertilizers, un-awareness about compost preparation and un-availability of financial support for preparation.
10. Out of 89 farmers' households, around 30 % will like to do supplementary occupation.

**Figure 2. Household ownership of land**







**Figure 3. Water conservation work done**
(Number of HH)




***Livelihood and financial inclusion***

1. Majority of the population is engaged in labour work
2. Dairy farming followed by goat farming is the most preferred supplementary occupation.
3. Among those who are not interested in doing any supplementary occupation 23 are marginal farmers.
4. Only 13 persons (out of 446 persons of more than 18 years of age) have traditional skills and all of them use it for generation of income.
5. Only 11 persons (out of 446 persons of more than 18 years of age) have vocational education but only 5 of them generate income by using that.

**Figure 4. Occupations of the population**



- **कृषी व सिंचन**

१) सर्वसाधारणतः अर्ध्यापेक्षा अधिक कुटुंबाकडे स्वतःची जमीन आहे.

२) स्वतःची जमीन असलेल्या ८७ कुटुंबांपैकी ६६ कुटुंबे ही अल्पभूधारक आहेत.

३) सर्वसाधारणतः या गावामधील शेतकरी सोयाबीन व कापूस ही नगदी पिके घेतात.

४) ८९ कुटुंबांपैकी १० कुटुंबाकडे शेतीसाठी १२ महिने पाण्याची उपलब्धता आहे. तर गावातील सर्वाधिक शेतकरी हे कोरडवाहू शेती करतात.

५) विविध प्रकारची जलसिंचनाची कार्ये झालेली आहेत, परंतू ७० टक्क्यापैक्षा अधिक कुटुंबे याबाबत अनभिज्ञ आहेत.

६) गावातील एकही शेतकरी हा 'शेतकरी उत्पादक संघाचा' सदस्य नाही.

७) बहुतांश शेतक-यांना शेतीविषयक शासकीय योजनांची माहिती नाही.

८) शेतीविषयक शासकीय योजनांची माहिती मिळण्याचा एकमेव स्त्रोत हा दुसरा शेतकरी आहे.

९) गावातील एकही शेतकरी कुटुंब गांडूळखत तथा सेंद्रिय खताची निर्मिती करत नाहीत. कारण रासायनिक खते वापरण्यास सोपे असून गांडूळखत व सेंद्रिय खत निर्मितीसाठी आर्थिक पाठबळाचा अभाव आहे.

१०)गावातील ८९ शेतकरी कुटुंबांपैकी जवळपास ३० टक्के शेतक-यांना शेतीपूरक व्यवसाय करायला आवडेल.

- **रोजगार व आर्थिक समावेशकता**

१) गावातील बहुतांश लोक हे मजूरवर्गातील आहेत.

२) शेती पुरक व्यवसाय म्हणून सर्वाधिक कुटुंबाना प्रामुख्याने दुग्धव्यवसाय करायला आवडेल, त्याचबरोबर बकरी पालन व्यवसाय पण करायला आवडेल.


३) शेतीपुरक व्यवसाय करण्याची आवड नसलेल्या कुटुंबापैकी २३ कुटुंबे ही अल्प भुधारक शेतकरी आहेत.

४) १३ व्यक्तींनाच (वय वर्ष १८ पेक्षा अधिक एकूण ४४६ व्यक्तींपैकी) परंपरागत व्यवसाय कौशल्य अवगत असून, ते सर्वजण त्यांच्याकडील कौशल्याचा उपयोग उत्पन्न मिळवण्यासाठी करतात.

५) केवळ ११ लोकांनीच (वय वर्ष १८ पेक्षा अधिक एकूण ४४६ व्यक्तींपैकी) व्यवसायिक शिक्षण घेतलेले असून त्यापैकी ५ व्यक्ती त्याचा उपयोग उत्पन्न मिळवण्यासाठी करतात.

6. Around 101 (23%) eligible people have applied for job card. Out of the applied 78 have obtained the job card and out of them only 10 have got some work.
7. 69 % of the households have no female who is member of Self Help Groups (SHGs)
8. There is no SHG for males in the village.
9. More than 85 % of the persons above 18 years of age have bank account. Even 80 % of persons above 6 years of age have bank account.

**Figure 5. MGNREGA status (number of HH)**





### Mother and child health

1. There is no pregnant lady found in the Grampanchayat area during the survey.
2. Among the delivered women all five are institutional deliveries.
3. Out of five babies born, weight of 2 babies is less than 2.5 kg at the time of birth.
4. All of them receive supplementary food from Aanganwadi.
5. All the 29 children in 0-6 age group have their births registered.
6. There are two households with malnourished children. Out of them children in one household receive special supplementary food from Aanganwadi.
7. Out of 7 children in the age group 1 to 2 years, only one child has none of the vaccination.

### Educational status

1. Around 15 % of the population is illiterate.
2. The percentage of population educated till 5th standard is more (These include school going children as well).
3. Around 68 Percent of the population has completed schooling.
4. The proportion of persons with higher education is negligible.
5. Only one child in the age group 6-18 is not going to school.

**Figure 6. Educational status of population (Percentage)**



६. जवळपास १०१ (२३ टक्के) पात्र लोकांनी रोजगार हमी योजनेतंर्गत जॉब कार्ड साठी अर्ज केला आहे. त्यापैकी ७८ लोकांना कार्ड मिळाले असून केवळ १० लोकांना काही ना काही काम मिळाले आहे.
७. गावातील ६९ टक्के कुटुंबातील एकही महिला, ही महिला बचत गटची सदस्य नाही.
८. गावामध्ये एकही पुरुष बचत गट नाही.
९. १८ वर्षापेक्षा अधिक वयोगटातील ८५ टक्के पेक्षा अधिक व्यक्तींचे बॅकेत खाते असून, ०६ वर्षापेक्षा अधिक वयोगटातील ८० टक्के व्यक्तींची बॅकेत खाती आहेत.

- **माता व बालकांचे आरोग्य**

  १) सर्वेक्षणाच्या कालावधीत ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये एकही गर्भवती महिला आढळून आली नाही.

  २) प्रसुती झालेल्या पाचही महिलांची संस्थात्मक प्रसुती झालेली आहे.

  ३) नवजात जन्मलेल्या एकूण ५ बालकांपैकी, २ बालके ही २.५ कि.ग्रॅ. वजनापेक्षा कमी वजनाची होती.

  ४) सर्व माता व बालकांना अंगणवाडीतून पूरक आहार मिळतो.

  ५) वय वर्ष ०-६ वयोगटातील सर्व २९ बालकांची जन्म नोंदणी झालेली आहे.

  ६) गावामध्ये केवळ २ कुटुंबामध्ये कुपोषित बालके आढळून आली. त्यापैकी एका कुटुंबातील बालकास अंगणवाडीतून पूरक आहार मिळतो.

  ७) वय वर्ष १-२ वयोगटातील ७ बालकांपैकी एका बालकाचे कोणत्याही प्रकारचे लसीकरण झालेले नाही.

- **शिक्षण**

  १) जवळपास १५ टक्के लोकसंख्या निरक्षर आहे.

  २) ५ वी पर्यंत शिक्षण घेतलेले लोक सर्वात जास्त आहेत.

  ३) उच्च शिक्षित लोकांचे प्रमाण नगण्य आहे.


  ४) जवळ जवळ ६८ टक्के लोकांनी शालेय शिक्षण पूर्ण केले आहे.

  ५) वय वर्ष ६-१८ वयोगटातील केवळ एकच बालक शाळेत जात नाही.

***Percolation of Government schemes***

1. More than 60 % of the households have caste certificate.
2. More than 80 % of the households have domicile certificate.
3. In general awareness about Government schemes such as Indira Gandhi Pension Yojana, Gahrkul Yojana, Students' Monthly *Bus Pas*, Students' Scholarship, *Sharvanbal Yojana* and *Magel Tyla Shettal, Sinchan Vihir Yojana* is very less as 5-20 eligible households have taken benefit of these schemes.
4. Out of 2 eligible women who have delivered a baby, one has taken benefit of *Janani Surkhsha Yojana.*

**Figure 7. Benefit of various schemes taken (Number of HH)**




***Use of Government e-services***

1. More than 80 % of the households are not aware of Maha-e-seva service.
2. More than 95 % of the households are unaware about 'Aapale Sarkar' Portal.

***Addiction (for above 0-6 age group)***

1. Major addiction is of Tobaco/Gutka/Khara.
2. 3 % of the population have found addicted to alcohol.

***Working children***

Only 6 children in the age group 15 to 18 are working. No child below 15 years of age is working.

- **शासकीय योजनांचा लाभ**

    १) जवळपास ६० टक्क्यापेक्षा जास्त कुटुंबांकडे जात प्रमाणपत्र आहे.

    २) जवळपास ८० टक्क्यापेक्षा जास्त कुटुंबांकडे आधिवास प्रमाणपत्र आहे.

    ३) इदिरा गांधी पेन्शन योजना, शालेय विद्यार्थ्यांसाठी मासिक बस पास योजना, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना, श्रावणबाळ  योजना, मागेल त्याला शेततळे, सिंचन विहिर योजना इ. शासकीय योजनासंबंधीत लोकांमधील जनजागृतीचे प्रमाण अंत्यत कमी आहे, कारण पात्र लाभार्थीपैकी केवळ ५-२० कुटुंबानीच या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

    ४) बाळंत झालेल्या २ मातांपैकी, एकच माता जननी सुरक्षा योजनेचा लाभ घेत आहे.

- **शासकीय सुविधांचा उपयोग**

    १) जवळपास ८० टक्क्यापेक्षा जास्त कुटुंबांना महा-ई सेवा सुविधेबाबत माहिती नाही.

    २) जवळपास ९५ टक्क्यापेक्षा जास्त कुटुंबांना आपले सरकार या पोर्टल बाबत माहिती नाही.

- **व्यसनाधिनता (०-६ वयाच्या वरील)**

    १) बहुतांश व्यक्तींमध्ये तंबाखू/गुटखा/खर्रा याचे व्यसन दिसून येते.

    २) ३ टक्के लोकांना दारूचे व्यसन आहे.

- **कामगार मुले**

    १५ ते १८ वयोगटातील केवळ ६ मुले काम करतात. १५ वर्ष वयोगटाखालील काम करणाऱ्या मुलांची संख्या ० आहे.

## *6 Suggested Interventions*

1. The list of households with negative value of indicators is given in Annexures. The corresponding facilities should be provided to them.

2. In addition some specific interventions are mentioned below.

i. The area of concern is livelihood. Skill development programme to be implemented for the persons in the age group 18-45 (Annexure 26). As there is highway near the villages, the vocational education of hoteling and vehicle repairing to be provided to youths.

ii. Making provision for house for 11 households staying on encroached land

iii. A campaign for use of toilets, *Shoshkhdda* for waste water and solid waste management to be organized with the help of school children

iv. The water conservation works to be implemented by taking collaboration of the concerned household, as many of them are unaware of such work

v. Farmers to be motivated to form an FPO and train them

vi. DRDA to visit the households in which no female is member of households and develop awareness about SHGs, also activating the formed SHGs

vii. Forming SHGs of male members through ATMA

viii. Hoardings and posters in villages and Grampanchayat mentioning Government schemes to displayed, an unemployed youth to be trained as an animator for dissemination of schemes. He/she should also demonstrate use of e-services. He/she can be given a small honorarium by the Grampanchayat and equipped with tablet with internet

ix. A massive anti-addiction campaign to be organized

**३८.शिफारशी**

**१) विकास प्रक्रियेच्या निर्देशकांचे नकारात्मक मुल्य असलेल्या कुटुंबाची यादी सोबत दिलेली असून त्यासंबंधित सेवा व सुविधा त्यांना देणे आवश्यक आहे.**

**२) या शिवाय काही विशिष्ट शिफारशी खालील प्रमाणे :**

i) लोकांच्या उपजिवेकेचा प्रश्न विचारात घेता, १८ ते ४५ वयोगटातील लोकांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात यावा. गावाच्या जवळून जाणा-या महामार्गाचा विचार करता गावातील तरुणांसाठी हॉटेल व गाड्या दुरुस्ती संबंधित व्यावसायिक शिक्षण पुरविण्यात यावे.

ii) अतिक्रमणामध्ये वास्तव्यास असलेल्या ११ कुटुंबांसाठी निवासाची व्यवस्था करावी.

iii) शौचालय वापर, शोषखड्डा, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन इ. बाबत शाळेतील मुलांच्या मदतीने जनजागृती शिबिरे घ्यावीत.

iv) शेतीत झालेल्या सिंचनाच्या कामापासून लोक अनभिज्ञ आहेत, त्यामुळे लोकांना सहकार्याने व विश्वासात घेऊन सिंचनाची कामे करण्यात यावीत.

v) शेतकरी उत्पादक संघ स्थापन करण्याबाबत शेतक-यांना प्रोत्साहित करावे.

vi) गावातील ज्या कुटुंबामध्ये एकही महिला, महिला बचत गटाची सदस्य नसेल अशा कुटुंबांना ग्रामीण विकास यंत्रणेने भेटी देऊन त्यांच्यात जनजागृती करावी. तसेच सुप्त अवस्थेतील बचत गटांना कार्यान्वित करावे.

vII) कृषी विभागाच्या आत्मा या यंत्रणेद्वारे गावामधील पुरुषांचे बचत गट स्थापन करावेत.

vIII) गावामध्ये व ग्रामपंचायतीमध्ये शासकीय योजनांची माहिती देणारे होर्डिंग्ज व पोस्टर्स लावण्यात यावीत, तसेच गावामधील सुशिक्षित बेरोजगार तरुण / तरुणीस शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी प्रशिक्षित करावे. या तरुणांनी ई-सेवा कशा वापराव्यात याचे प्रात्यक्षिक करुन दाखवावे. या बेरोजगार तरुण / तरुणीस ग्रामपंचायतीमार्फत मानधन अदा करण्यात यावे तसेच इंटरनेट सेवेसह टॅब्लेट/संगणक देण्यात यावे.

ix) गावातील व्यक्तींच्या व्यसन मुक्तीसाठी मोठ्या प्रमाणात व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन करावे.

## Appendix

### Indicators used for Grampanchayat Index

| SN | SN within dimension | Indicator | Value |
|---|---|---|---|
| | | **Household infrastructure** | |
| 1 | 1 | Percentage of HH with Electricity | 94.3% |
| 2 | 2 | Percentage of HH with LPG | 39.9% |
| 3 | 3 | Percentage of Owned HH | 97.5% |
| 4 | 4 | Percentage of HH with availability of drinking water for 12 months | 60.8% |
| 5 | 5 | Percentage of HH using individual toilets | 96.5% |
| 6 | 6 | Percentage of HH with hygeinic drainage facility | 51.9% |
| 7 | 7 | Percentage of HH with hygenic facility of garbage disposal | 28.5% |
| 8 | 8 | Percentage of pacca house | 43% |
| | | **Agriculture** | |
| 9 | 1 | Percentage of HH with owned land | 57.0% |
| 10 | 2 | Percentage of HH with irrigated land | 7.7% |
| 11 | 3 | Percentage of HH (farmers) doing supplementary occupation | 29.2% |
| | | **Financial inclusion and income** | |
| 12 | 1 | Percentage of HH with at least one woman as member of SHG | 31.0% |
| 13 | 2 | Percentage of persons with bank account | 80.6% |
| 14 | 3 | Percentage of persons who use traditional skills for income generation (out of 13) | 2.9% |
| 15 | 4 | Percentage of persons who use vocational education for income generation (out of 11) | 1.5% |
| 16 | 5 | Percentage of persons who have applied for job card and getting work in MGNREGA | 12.8% |
| | | **Education** | |
| 17 | 1 | Mean Years of Schooling of the population of age 25 years and above | 5.7 Years |
| 18 | 2 | School life expectancy of the population of age 6-18 years of age | 13 Years |
| | | **Percolation of Government schemes** | |
| 19 | 1 | Percentage of eligible HH who have taken benefit of Indira Gandhi Pension Yojana | 3.8% |
| 20 | 2 | Percentage of eligible HH who have taken benefit of Gharkul Yojana | 15.2% |
| 21 | 3 | Percentage of eligible HH who have taken benefit of Student monthly bus pass | 15.8% |
| 22 | 4 | Percentage of eligible HH who have taken benefit of Student Scolarship | 17.7% |
| 23 | 5 | Percentage of eligible HH who have taken benefit of Sanjay Gandhi Niradhar Yojana | 10.1% |
| 24 | 6 | Percentage of eligible HH who have taken benefit of Shravanbal Yojana | 15.8% |
| 25 | 7 | Percentage of eligible HH who have taken benefit of Magel tyala shetatale | 0.0% |
| 26 | 8 | Percentage of eligible HH who have applied for job card under MGNREGA and received work | 12.8% |

**परिशिष्ट**

**ग्रामपंचायतीचा निर्देशांक काढण्यासाठी वापरलेले निर्देशक**

| अ.क्र. | निर्देशक | मूल्य (%) |
|---|---|---|
| | **गृहविषयक पायाभूत सुविधा** | |
| १. | घरात वीजपुरवठा असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ९४.३ |
| २. | एल.पी.जी. असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ३९.९ |
| ३. | स्वतःचे घर असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ९७.५ |
| ४. | १२ महिने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ६०.८ |
| ५. | स्वतःचे शौचालय वापरात असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ९६.५ |
| ६. | सांडपाण्याची चांगली व्यवस्था असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ५१.९ |
| ७. | चांगले घनकचरा व्यवस्थापन असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | २८.५ |
| ८. | पक्के घर असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ४३ |
| | | |
| | **कृषी व सिंचन** | |
| १. | स्वतःच्या मालकीची जमीन असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ५७ |
| २. | सिंचनाखाली जमीन असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ७.७ |
| ३. | शेतीपुरक व्यवसाय करत असलेल्या कुटुंबाचे/शेतक-यांचे प्रमाण | २९.२ |
| | | |
| | **रोजगार व आर्थिक समावेशकता** | |
| १. | बचत गटाची एकतरी महिला सदस्य असलेल्या कुटुंबाचे प्रमाण | ३१ |
| २. | बॅकेत खाते असलेल्या व्यक्तींचे प्रमाण | ८०.६ |
| ३. | उत्पन्न मिळविण्यासाठी पारंपारिक कौशल्याचा उपयोग करणा-याचे व्यक्तींचे प्रमाण | २.९ |
| ४ | उत्पन्न मिळविण्यासाठी व्यावसायिक शिक्षणाचा उपयोग करणा-याचे व्यक्तींचे प्रमाण | १.५ |
| ५. | मनरेगा अंतर्गत जॉबकार्डसाठी अर्ज करणा-या व काम मिळालेल्या व्यक्तींचे प्रमाण | १२.८ |
| | | |
| | **शिक्षण** | |
| १. | २५ व त्यापेक्षा अधिक वयोगटातील व्यक्तींची शाळेतील सरासरी वर्ष | ५.७ वर्षे |
| २. | ६ ते १८ वयोगटातील व्यक्तींची शाळेतील अपेक्षित वर्ष | १३ वर्षे |
| | | |
| | **शासकीय योजनांच्या लाभाचा निर्देशांक** | |
| १. | इंदिरा गांधी पेन्शन योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र कुटुंबाचे प्रमाण | ३.८ |
| २. | घरकुल योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र कुटुंबाचे प्रमाण | १५.२ |
| ३. | विद्यार्थ्यासाठी मोफत बस पास योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र कुटुंबाचे प्रमाण | १५.८ |
| ४ | शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र कुटुंबाचे प्रमाण | १७.७ |
| ५. | संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र कुटुंबाचे प्रमाण | १०.१ |
| ६. | श्रावणबाळ योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र कुटुंबाचे प्रमाण | १५.८ |
| ७. | मागेल त्याला शेततळे योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र कुटुंबाचे प्रमाण | ० |
| ८. | मनरेगा योजनेंतर्गत जॉबकार्डसाठी अर्ज करणा-या व काम मिळालेल्या पात्र कुटुंबाचे प्रमाण | १२.८ |